**Outward No.BMCSW/-322/2022-23** **Date- 20 / 08 /2022**

3.2.2.1 Number of Workshops / Seminars conducted on research methodology Intellectual property Rights (IPR) and enterpreneurship year wise during last five years

| | |
|---|---|
| Criteria 3.2.2.1 | Total number of workshops / seminars conducted on Research methodology, Intellectual property Rights (IPR) and enterpreneurship year wise during last five years |
| Findings of DVV | Provide 1) Detailed report for each programme.<br>2) Broucher / NGO tagged photograph with date and captions, title of the workshops / seminars conducted.<br>3) Details of Resource persons. |
| Response/Clarification | 1) Detailed report for each programme is attached (APPENDIX-I)<br>2) Broucher and photograph with date and caption, Title of the workshop / seminar is attached. (APPENDIX-II)<br>3) Details List of Resource person is attached. (APPENDIX - III) |

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

BMC's, College of Social Work, Chopda — IQAC

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

# Appendix-I

**Report of Webinar on Social Work Intervention in Corona Pandemic Crises - Issues, Challenges, Strategies & Role**

**Date : 8 & 9 May 2020**

Due to Covid Pandemic many academic activities were stopped and all academicians are working through Online mode. There is no direct correspondence due to pandemic. Our college decided to organize webinar on **'Social Work Intervention in Corona Pandemic Crises - Issues, Challenges, Strategies & Role' dated : 8 & 9 May 2020** in collaboration with Maharashtra Association of Social Work Educators (MASWE)

In the inauguration function Vice Chancellor of Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon Prof. Dr. P. P. Patil inaugurate the webinar and in the address they assured about the solution on Corona.

In the first session of webinar Prof. Dr. Ambadas Y. Motihe, Founder President MASWE and Senior Academic Consultant, Regional Centre YCMOU, Amaravati University focused on the current situation due to pandemic in the community specially of the poor people and suggests how to play role in handling such crises. After delivering the lecture Prof. Ambadas Mohite answer the questions raised by the participants.

In the next session Prof. Dr. Vijay Shinganapure, Retired Professor Tirpude College of Social Work, Nagpur express their views about role of government NGO's and civil society during Corona Pandemic. He also shares some experience of district collector Nagpur during counselling to the frighten and needy people.

In the third session Prof. Dr. Deepak Walokar President MASWE and Director Karve Institute of Social Services, Pune delivered his speech on pandemic situation, social issues, problems and role of social workers. He also answered to the question raised during the session.

In the last session Prof. Dr. Mrs. Swati Dharmadhikari, Tirpude College of Social Work, Nagpur and Executive Member of MASWE highlighted on current pandemic, psycho social issues and role of social worker in handling such issues. She also discusses with the participant through question-answer session.

In the end of webinar co-ordinator of this webinar Dr. Anant Deshmukh express vote of thanks. Near about 179 participants were participated from all over the India in the webinar.

For this webinar White code, Pune provides the technical support. Prof. Ashish Gujarathi, Convenor of this webinar took sincere efforts to success this webinar.

This webinar is organized by IQAC, BMC's College of Social Work, Chopda, Dist. Jalgaon.

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

BMC's, College of Social Work, Chopda
IQAC

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

## Report of Webinar on Role of Youth In Corona Pandemic Crises
## Date : 14 & 15 May 2020

समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी कोरोना संदर्भात हितगुज करता यावे यासाठी भगिनी मंडळ, चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा यांनी दि. १४ व १५ मे २०२० रोजी महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) यांच्या संयुक्त विद्यमाने Report of Webinar on Role of Youth In Corona Pandemic Crises या विषयावर राष्ट्रीय स्तरावरील वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनाचे उद्घाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिष्ठाता, समाजविज्ञान विद्या शाखा, प्रा.डॉ. प्रमोद पवार यांच्या शुभहस्ते, श्री. आशिषभाई अरुणलाल गुजराथी, सल्लागार सदस्य-महाविद्यालय विकास समिती, समाजकार्य महाविद्यालय, चोपडा आणि प्रा.डॉ. अंबादास मोहिते, संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

प्रथम सत्रात सो. ज्योती अंबादास मोहिते, राज्य समन्वयक, नेहरु युवा केंद्र संघटन, महाराष्ट्र आणि गोवा यांनी Report of Webinar on Role of Youth In Corona Pandemic Crises या विषयावर आपले विचार मांडलेत. त्यांनी कोरोना काळात नेहरु युवा केंद्र संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध राज्यात कोरोनाग्रस्तांना जी मदत केली त्याच्या काही यशोगाथा आणि वास्तविकता आपल्या मार्गदर्शनातून मांडलेत.

त्यानंतर भारतातील समाजकार्य महाविद्यालयात शिकणाऱ्या व स्वयंसेवी संस्थेत कार्यरत असणाऱ्या अनेक आजी-माजी विद्यार्थ्यांनी सौ. ज्योती मोहिते यांना विचारलेल्या प्रश्नांचे निरसन केले.

या वेबिनारसाठी भारतभरातून जवळपास २०० च्या वर विद्यार्थी सहभागी झाले होते. या वेबिनारचे आयोजन समाजकार्य महाविद्यालयातील IQAC चे प्रा.डॉ. अनंत देशमुख यांनी केले असून संयोजक म्हणून प्रा. आशिष गुजराथी यांनी विशेष प्रयत्न केले. या वेबिनारची तांत्रिक बाजू प्रा.डॉ. अनंत देशमुख व श्री. अजय बारी यांनी सांभाळली.

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

BMC's, College of Social Work, Chopda — IQAC

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

IQAC
BMC's, College of Social Work, Chopda

**भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा**
**वेबिनार- दिनांक 23 .5. 2020**
**विषय- Role of housewife in Corona pandemic Crisis**

दिनांक 23 .5. 2020 रोजी इनरव्हील क्लब चोपडा व भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी *Role of housewife in Corona pandemic Crisis या विषयावर एक वेबिनार आयोजित केलेला होता.

या वेबिनारची सुरूवात प्रास्ताविक डॉ कांचन टिल्लू यांनी,पाहुण्यांचे स्वागत सौ आश्विनी गुजराथी व या वेबिनारच्या उद्घाटन, सौ.वैजंती पाठक (डिस्ट्रीक प्रेसिडेंट डिस्ट्रीक ३०३, इनरव्हिल क्लब, जळगाव) यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन व वेबिनारच्या उद्घाटकीय मनोगताने झाली. Webinar च्या प्रमुख वक्त्या- *डॉ. स्वाती धर्माधिकारी* समुपदेशक व सहयोगी प्राध्यापक, तिरपुटे समाजकार्य महाविद्यालय *नागपूर* या होत्या. या कार्यक्रम प्रसंगी स्वाती धर्माधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे काही महत्वपूर्ण मुद्दे...

1) सतत 60 दिवसांपासून आपण लोक डाऊन मध्ये असताना महिलांच्या मनात कोरोना विषयी अनेक भावनिक आंदोलनं होत असतात म्हणजे काही महिला त्याला त्रिवीलायझेशन ( *Trivilization*) म्हणजे शुल्लक गोष्ट समजतात तर काही महिला त्याला टेरीब लायझेशन(* Terribalization*) समजतात, त्यामुळेच त्यांच्या भावनांवर परिणाम होऊन त्यांची एन्झायटी (Enxiety), भीती वाढते त्या चिंताग्रस्त होतात आणि म्हणूनच त्यांच्या प्रतिकारशक्ती (*immune system*) परिणाम होतो.म्हणून कारोनाला स्वीकारूनच आपल्याला त्यासोबत चालावयाचे आहे.

2) कोरोना विषयी जे भावनिक असंतुलन आपल्यामध्ये झाले आहे त्यामुळे निरुत्साह, चिडचिडेपणा निद्रानाश, या प्रकारची प्रवृत्ती वाढत जात आहे म्हणून Enxiety And panicness या दोन गोष्टी वाढत आहेत.

3) Lockdown Period मध्ये घरातले सगळेच घरी त्यामुळे महिलांसाठी जो *मी टाईम* ( *Me Time*) मिळत होता म्हणजेच घरातील सर्व सदस्य आपापल्या कामावर निघून गेल्यानंतर जो वेळ मिळतो तो पण आता तसं होत नाही म्हणून महिलांच्या घरातील वेळेचे शेड्डल (schedule) बदललेला आहे. त्यांच्या आधीच्या वेळापत्रकाचे पूर्ण बारा वाजलेले आहेत. म्हणून गृहिणिवर आता 24 तास काम असं झालेला आहे. त्यामुळे स्वतःचा वेळ गृहिणीला मिळत नाहीये कारण ज्यांची मुले शाळेत जाणारी आहेत ते पूर्णवेळ घरी आहेत, जी बाळ पाळणाघरात असतात ती बाळ आता आईजवळच आहेत , घरातील वृद्धांची काळजी घ्यावी लागत आहे म्हणून घरातील थिंग टँक ( *Think Tank*) म्हणजे घरातील महिला या सेंट्रलाइज(centralise) झालेल्या आहेत गृहिणी केंद्रित असं सगळं कामकाज चालू आहे.. असताना गृहिणीला गृहीत धरले जाते का हो?

4) प्रत्येक घरात दोन प्रकारचे संवाद होतात पहिला सुसंवाद आणि दुसरा विसंवाद यापैकी आपल्या घरात कुठला संवाद नेमका होत आहे? मुळातच नात्यांची न्यूव आहे ती जर कमकुवत असेल तर मग अशा घरांमध्ये विसंवाद होत आहे म्हणजेच कौटुंबिक हिंसाचार होत आहे. म्हणून आपल्या नात्यांमधील जी निव आहे ती मजबूत करणे या काळात महत्त्वा चे आहे..

5) या काळात सकारात्मक विचार (positive thinking)ठेवून आनंदी राहणं ,उत्साही राहणं, पुस्तक वाचन करणं, आपले छंद जोपासणे हे फार महत्त्वाचे आहे.

या वेबिनारच्या यशस्वितेसाठी आय क्यु ए.सी समन्वयक डॉ अनंत देशमुख यांनी तसेच सौ. अश्विनी गुजराथी ( डिस्ट्रीक सेक्रेटरी, डिस्ट्रिक ३०३, इनरव्हिल क्लब, चोपडा, डॉ कांचन टिल्लू ( प्रेसिडेंट, इनरव्हिल क्लब चोपडा, प्रा. चेतना बडगुजर ( सेक्रेटरी इनरव्हिल क्लब चोपडा) यांनी तसेच श्री सोमनाथ बारी, श्री अजय बारी यांनी परिश्रम घेतले.

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

महाराष्ट्र शासन अनुदानित व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव संलग्नीत
भगिनी मंडळ चोपडा संचलित,
समाजकार्य महाविद्यालय चोपडा जि.जळगांव
महाराष्ट्र शासन मान्यता पत्र क्र. CSW.1094/12355/F.N.107/Sudhar,1 Dt.30/6/1994
विद्यापीठ मान्यता पत्र क्र. NMU/94/5/J-48/6152 Date:-13/9/1994
Dr.Ishwar M. Saundankar
Principal
Phone No.02586-223017
Fax No. 02586 -223017, 220533
भगिनी मंडळ, चोपडा, जि. जळगांव
'B' Grade NAAC Accredited (2.66)
Mrs.Poonam Ashish Gujarathi
President
Post Box No.20, Chopda
Phone No.02586-220015

जा.क्रं.- भमसकाम/ /2018-19 दिनांक - / / 2018

महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई व
भगिनी मंडळ चोपडा संचलित,समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव
यांच्या संयुक्त विद्यमाने

## चोपडा तालुक्यातील ग्रामपंचायत महिला सदस्यांसाठी डिजिटल साक्षरता विषयक एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा

## अहवाल

**दिनांक- २१ डिसेंबर, २०१९ सकाळी- १०.०० ते ११.००- नोंदणी व चहा नाश्ता**

**प्रस्तावना:-**

डिजिटल युगाची गरज जक्षात घेता महिलांना सामाजिक क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी राज्य महिला आयोगाच्या वतीने महिलांसाठी डिजीटल साक्षरता अभियान हाती घेण्यात आले आहे. एक महिला शिकली की ती संपूर्ण घराला शिक्षित करते आणि सोबत इतर चार घरातील महिलांना शिक्षित करते. डिजीटल साक्षरता ही काळाची गरज आहे. स्वातंत्र्य काळाचा विचार केल्यास १९४७ मध्ये भारतातील साक्षरता फक्त १२ टक्के होती. ती २०११ मध्ये ७५ टक्के पर्यंत वाढली आहे. हे सर्व शिक्षणाचा प्रसार-प्रचारामुळे घडले. त्यासाठी भविष्यात महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम आणि स्वावलंबी करायचे असेल तर डिजीटल साक्षर करणे गरजेचे आहे. डिजिटल साक्षरता म्हणजे रोजच्या जीवनात अर्थपूर्ण कार्य करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान समजण्याची आणि ते वापरण्यासाठी सक्षम करणे होय. भारताला डिजिटल सक्षम समाज बनविणे या महत्वाकाक्षी उद्‌देशाने भारत सरकारने डिजिटल इंडिया कार्यक्रम सुरु केलेला आहे. त्यासाठी महिला आयोगातर्फे विविध स्वयंसेवी संस्था व महाविद्यालयाची मदत घेतली जात आहे. यासाठी राज्यभरात कार्यशाळेचे आयोजन करुन महिलांना डिजिटली सक्षम करण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. या अभियानात ग्रामीण भागातील महिलांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

हाच उद्देश डोळयासमोर ठेवून महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या मार्फत चोपडा तालुक्यातील ग्रामपंचायत महिला सदस्यांसाठी डिजीटल साक्षरता विषयक एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजनाचे आमच्या भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांना देण्यात आले. त्या कार्यशाळेचे

..२...

आयोजन दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यशाळेचा थोडक्यात अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**कार्यशाळेचे उद्देश-**

१) भारत सरकारने लोकांच्या विकासासाठी डिजिटल साक्षरता हा उपक्रम सुरु केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून ग्रामपंचायत पातळीवरील महिलांना डिजिटल साक्षरता या संदर्भात माहिती देण्यासाठी सदर प्रशिक्षण देण्यात येत आहे.

२) या प्रशिक्षणामार्फत महिलांना मुलभूत ऑनलाईन प्रक्रियेमार्फत ग्रामपंचायत पातळीवर विविध कामाचा आढावा घेण्यात यावा हा यामागील उद्देश आहे.

३) ग्रामपंचायत महिला सदस्यांना डिजिटल साक्षरता विषयक जनजागृती आणि वापर या विषयी प्रशिक्षण देणे.

४) डिजिटल सेवांचा वापर करण्याचे कौशल्य या विषयी प्रशिक्षण देणे.

५) ऑनलाईन सेवांचा, विविध ॲपचा वापर करणेविषयी प्रशिक्षण देणे.

६) शासनाच्या विविध ऑनलाईन सेवांचे प्रशिक्षण देणे.

या कार्यशाळेमध्ये चोपडा तालुक्यातील सरपंच महिला, ग्रामपंचायत सदस्या, ग्रामसेवक महिला आणि महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेत एकुण १०३ महिला सहभागी झाल्या होत्या.

**उद्घाटन सोहळा-**

कार्यशाळेचे उद्घाटन मा.श्री.भरत कासोदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती चोपडा यांच्या हस्ते कै.डॉ.सुशीलाबेन शाह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आले. या प्रसंगी मा.सौ.पुनम गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा, डॉ.ईश्वर सौंदाणकर, प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय चोपड, डॉ.विनोद रायपुरे, अध्यक्ष अभ्यास मंडळ, कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, श्री.जितेंद्र महाजन व श्री समाधान कोळी, समन्वयक, पंचायत समिती चोपडा, तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ.ईश्वर सौंदाणकर, प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांनी केले. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या या एकदिवसीय डिजिटल साक्षरता या विषयावरील कार्यशाळेचे महत्व उपस्थित महिलांना सांगितले. तसेच सर्व उपस्थित महिलांना या कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या. डिजिटल युगाची गरज लक्षात घेता त्याचे महत्व वापर महिलांनी भविष्यामध्ये या कार्यशाहैच्या माध्यमातून करावा असे आवाहन त्यांनी उपस्थित महिलांना केले.

यानंतर कार्यशाळेचे उद्घाटक मा.श्री.भरत कासोदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चोपडा यांनी उपस्थित सर्व महिलांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ऑनलाईन प्रक्रियेविषयी माहिती सांगितली. तसेच सर्व शासकीय कामकाज व व्यवहार आपण मोबाईलच्या माध्यमातून कमीत कमी वेळेत करु शकतो. आपल्या दैनंदिन जीवनात डिजीटल व्यवहारांचे महत्व त्यांनी सांगितले.

यानंतर कार्यशाळेच्या अध्यक्षा, सौ.पुनमबेन गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा यांनी आजच्या काळातील महिला सक्षमिकरण हे डिजिटल साक्षरतेचा वापर प्रत्यक्ष जीवनात केल्याशिवाय होणार नाही, तसेच मोबाईलचा वापर आपल्या आयुष्यात स्वतःचा विकास करण्यासाठी केला पाहिजे असे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले. तसेच या कार्यशाळेत आपण नव्याने शिकलेल्या गोष्टींचा वापर आपल्या गावाच्या विकासाकरीता करावा असे आवहन त्यांनी उपस्थित महिलांना केले.

या कार्यशाळेचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.उत्तम सोनकांबळे, समन्वयक, डिजिटल साक्षरता कार्यशळा यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन प्रा.डॉ.संबोधी देशपांडे, समन्वयक, डिजिटल साक्षरता, यांनी केले.

**प्रथम सत्र - सकाळी- ११.०० ते ०१.००**

**श्री.जितेंद्र महाजन व श्री.समाधान कोळी**

**विषय- ग्रामपंचाय कामकाजात डिजीटल साक्षरतेचे महत्व व उपयोग**

यानंतर श्री.जितेंद्र महाजन व श्री समाधान कोळी, समन्वयक, पंचायत समिती, चोपडा यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ऑनलाईन प्रक्रिया कशी करावी या विषयी महिलांना माहिती दिली. तसेच आपले सरकार या शासनाच्या वेबसाईट विषयी महिलांना सविस्तर माहिती दिली. सदरील सर्व प्रशिक्षण पी.पी.टी.च्या माध्यमातून सादर करण्यात आले होते.

**प्रथम सत्रानंतर दुपारी ०१.०० ते ०२.००**

**-भोजन-** सर्व सहभागी महिलांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

**द्वितीय सत्र- दुपारी- ०२.०० ते ०४.००**

**प्रशिक्षक- मा.मेघना देशमुख, प्रशिक्षक, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, नाशिक**
**मा.पल्लवी सोमवंशी, सहप्रशिक्षक, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, जळगांव**

**विषय- डिजिटल साक्षरतेचे महत्व व प्रत्यक्ष उपयोग**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई येथील अध्यक्षा डॉ.विजया रहाटकर यांचा डिजिटल साक्षरतेवरील संदेश देणारा व्हीडीओ महिलांना दाखविला. त्यानंतर मोबाईल क्रमांक-७८८७८१९८९४ या नंबरवर Missed Call देवून आपली या कार्यशाळेसाठीची ऑनलाईन उपस्थिती महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे नोंदविण्यात आली. यानंतर त्यांनी नमो ॲप, तेजस्विनी ॲप, भिम ॲप, आपले सरकार ॲप, याविषयीची सविस्तर माहिती उपस्थित महिलांना दिली.

भिमॲप हे प्रत्यक्ष आपल्या मोबाईलमधील प्ले-स्टोअर मध्ये डाऊनलोड करण्यास सांगितले आणि भिम ॲपचे रजिस्ट्रेशन कसे करावे हे प्रत्यक्ष दाखवून दिले. भिमॲपच्या माध्यमातून एका अकाऊंट मधून दुसऱ्या कआऊंडमध्ये प्रत्यक्ष पैसे पाठविण्याची पध्दती विषयी प्रात्यक्षिक उपस्थित महिलांना करुन दाखविले.

यानंतर मा.मेघना देशमुख यांनी महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रीक बोर्ड यांचे लाईटबिलावरील क्यु-आर-कोडवर मोबाईल नेऊन त्याद्वारे लाईटबील किती रुपये आले आणि ते भरण्याविषयी प्रात्यक्षिक करुन

दाखविले.

यानंतर मा.पल्लवी सोमवंशी यांनी महिलांच्या सुरक्षेतेबाबत असणारा तेजस्विनी ॲप महिलांच्या मोबाईलवरील प्ले-स्टोअर मधून डाउनलोड करण्यास सांगितला. महिलांना अडचणीच्या वेळी अपल्या स्वत:च्या सुरक्षिततेसाठी तेजस्विनी ॲपच्या माध्यमातून कशी काळजी घ्यावी याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. तसेच 100, 108, 1098 इ. नंबरवर Missed Call देवून किंवा संपर्क साधून महिलांच्या सुरक्षितते संदर्भत मदत घेऊ शकतात अशी माहिती त्यांनी महिलांना दिली.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून मा.मेघना देशमुख व मा.पल्लवी सोमवंशी यांनी ग्रामप्रचायत महिला सदस्यांसाठी डिजिटल साक्षरता या विषयावरील घेण्यात आलेल्या एक दिवसीय कार्यशाळेत महिलांना डिजिटल साक्षरतेचे महत्व तसेच ऑनलाईन मनी ट्रान्सफर, महिला सुरक्षा, आपले सरकार, तेवस्विनी ॲप इ. विषयी प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करुन दाखविली. तसेच ऑनलाईन पध्दतीने कोणत्याही प्रकारचे व्यवहार करत असतांना घ्यावयाची काळजी उदा-ओटीपी कोणालाही न सांगणे, अेटीएम चा पिन क्रमांक, बॅंक अकाऊंन्टची माहिती कोणालाही देऊ नये असे आवाहन त्यांनी उपस्थित महिलांना केले.

**दुपारी- ०४.०० ते ०४.१५ चहापाणी**

**दुपारी- ०४.१५ ते ०५.०० चर्चासत्र- महिलांशी संवाद - समस्या व अडचणींचे निरसन**

सदर कार्यशाळेत सहभागी महिलांनी आपले अनुभव सर्वसमक्ष सादर केले, कामात येणाऱ्या अडचणी व समस्या यावर चर्चा करण्यात येवून त्या सोडविण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

**दुपारी- ०५.०० ते ०५.३० समारोप व प्रमाणपत्र वाटप**

सदर कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ.संबोधी देशपांडे व प्रा.डॉ.उत्तम सोनकांबळे यानी काम पाहिले. सदर कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा.आशिष गुजराथी यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कम्रचारी यांनी परिश्रम घेतले. तसेच प्रशिक्षणासाठी आवश्यक असणारी इंटरनेट सुविधा, वाय-फाय सेवा गॅलेग्झी कॉम्प्यूटर, चोपडा यांनी उपलब्ध करुन दिली.

कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना डिजिटल तंत्रज्ञानाची ओळख करुन दिली गेली. तसेच कार्यशाळेत डिजिटल क्षेत्रातील तज्ञांकडून महिलांमध्ये डिजिटल सेवा आणि तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

शेवटी काही प्रशिक्षणार्थींकडून त्यांचे मनोगत घेण्यात आले.

धन्यवाद..!

(प्रा.डॉ.उत्तम ज.सोनकांबळे) (प्रा.डॉ.संबोधी म. देशपांडे) (डॉ.ईश्वर एम.सौंदाणकर)

**समन्वयक** **प्राचार्य,**

**भगिनी मंडळ चोपडा संचलित,**

**समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव**

IQAC ...College of Social Work, Chopda




**कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर उद्घाटनपर भाषण करीता असतांना मा.श्री.भरत कासोदे**




**कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर मार्गदर्शन करीता असतांना सौ.पुनमबेन गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा**




**कार्यशाळेत मार्गदर्शन करीत असतांना मा.श्री.जितेंद्र महाजन, समन्वयक,**
**पंचायत समिती चोपडा**




**कार्यशाळेत मार्गदर्शन करीत असतांना मा.श्री.समाधान कोळी, समन्वयक,**
**पंचायत समिती चोपडा**



कार्यशाळेत मार्गदर्शन करीत असतांना मा.मेघना देशमुख, प्रशिक्षक, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, नाशिक



कार्यशाळेत मार्गदर्शन करीत असतांना मा.पल्लवी सोमवंशी, सह प्रशिक्षक, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, जळगांव



प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी महिला



प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी महिला




**कार्यशाळेचे सुत्रसंचलन करीत असतांना प्रा.डॉ.उत्तम सोनकांबळे**




**प्रशिक्षण कार्यशाळेत आभार प्रदर्शन करीत असतांना कार्यशाळेच्या समन्वयक डॉ.संबोधी देशपांडे**



प्रशिक्षण कार्यशाळेत भोजनाचा आस्वाद घेत असतांना सहभागी महिला



प्रशिक्षण कार्यशाळेत भोजनाचा आस्वाद घेत असतांना सहभागी महिला




**प्रशिक्षण कार्यशाळेविषयी आपले मत व्यक्त करीत असतांना प्रशिक्षणार्थी महिला**




**प्रशिक्षण कार्यशाळेविषयी आपले मत व्यक्त करीत असतांना प्रशिक्षणार्थी महिला**

# चोपडा येथे डिजिटल साक्षरता या विषयावर कार्यशाळा संपन्न

**चोपडा (प्रतिनिधी)** - महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या मार्फत ' डिजिटल साक्षरता ' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. २१ डिसेंबर २०१९ रोजी भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेत चोपडा तालुक्यातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक आणि विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. या कार्यशाळेत सर्व महिलांना 'डिजिटल साक्षरता' या विषयावर प्रशिक्षण मेघना देशमुख, नाशिक आणि पल्लवी सोमवंशी, जळगाव यांनी दिले. यामधे महिलांना ऑन लाईन मनी ट्रान्स्फर, महिला सुरक्षिते बाबत उपलब्ध असणाऱ्या ऑन लाइन सेवा तसेच विविध योजनांचे ऑन लाइन पध्दतीने काम कसे करावे, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची मदत घेण्याची पध्दती इ. विषयावर सविस्तर माहिती देण्यात आली.

सदर कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी भरत कासोदे (गट विकास अधिकारी, पंचायत समिती चोपडा), पूनमभाभी गुजराथी(अध्यक्षा, भगिनी मंडळ, चोपडा), डॉ. ईश्वर सौदाणकर (प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय), डॉ. विनोद रायपूरे(अध्यक्ष, अभ्यास मंडळ), जितेंद्र महाजन आणि समाधान कोळी(पंचायत समिती, चोपडा), महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. उत्तम सोनकांबळे व डॉ. संबोधी देशपांडे यांनी काम पाहिले. सदर कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा.आशिष गुजराथी यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



महाराष्ट्र शासन अनुदानित व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संलग्नीत
Recognised by Govt. of Maharashtra & Affilated to KBC North Maharashtra University,Jalgaon (MS)
Govt.of Maharashtra Reg.Letter No. CSW.1094/12355/F.N.107/Sudhar,1 Dt.30/6/1994
'B' Grade NAAC Accredited (2.66)
University Affilation Letter No. NMU/94/5/J-48/6152 Date:-13/9/1994
भगिनी मंडळ चोपडा संचलित,
# समाजकार्य महाविद्यालय चोपडा
Bhagini Mandal Chopda's
# COLLEGE OF SOCIAL WORK CHOPDA
फोन नं.(02586) 223017 फॅक्स:(02586) 223017
Phone No.02586-223017 Fax No.02586 -223017
Principal-Dr.Ishwar M. Saundankar
President-Mrs.Poonam A. Gujarathi

**Outward No.BMCSW/335/2019-20** **Date- 25/2/2020**

प्रति,
मा.संचालक सो.
विद्यार्थी विकास विभाग
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव

विषय:-एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा अहवाल व हिशेब पत्रक स्विकारणेबाब...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती की, भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव येथे आमच्या भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव येथे **दिनांक- १५ फेब्रुवारी, २०२०** रोजी **"Women Contribution in National Development"** या विषयावर राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. सदर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा अहवाल कार्यक्रमाचे फोटोसह पाठवित आहोत. तसेच कार्यक्रमाचे खर्चाचे हिशोब पत्र पाठवित आहोत.

कृपया स्विकार व्हावा ही विनंती.
स्नेहादराने,

आपला विश्वासू,

(डॉ.ईश्वर मा.सौंदाणकर)
प्राचार्य,
भगिनी मंडळ चोपडा संचलित,
समाजकार्य महाविद्यालय चोपडा,
जि.जळगांव

**सोबत:**-१) अहवाल व फोटो
२) खर्चाचे व्हावचर्स

||संस्कृती रक्षति: स्त्री शक्ति:||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव

||संस्कृती रक्षति: स्त्री शक्ति: ||

भगिनी मंडळ,
चोपडा, जि. जळगांव

**स्थापना वर्ष-१९९४**

# राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान

## एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

# अहवाल व हिशोब पत्रक

**दिनांक-१५ फेब्रुवारी, २०२०**

प्रा.डी.जी.भागवत    प्रा.डॉ.एम.यु.उपासनी    प्रा.डॉ.एस.एम.देशपांडे

**समन्वयक**

**राष्ट्रीय परिषद-२०२०**

**डॉ.ईश्वर आय.सौंदाणकर**

**प्राचार्य**

**समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव**

Sundhargadhi, Chunchale Road,
Tal-Chopda, Dist-Jalgaon
Phone No.02586-223017

# राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान

## दिनांक- १५ फेब्रुवारी, २०२०

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्या यांच्या सहयोगाने "राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान" या विषयावरील दि.15/02/2020 रोजी एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर परिषदेच्या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.प्रा.पी.पी.माहुलीकर (प्र.कुलगुरु, कबचौउमवि,जळगांव) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भगिनी मंडळ चोपडा शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा, सौ.पुनम आशिषलाल गुजराथी या होत्या तर प्रमुख अतिथी मा.श्री.आशिषभाई गुजराथी (उद्योगपती, चोपडा) मा.सौ.छायाबेन गुजराथी (उपध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा) सौ.मीना गुजराथी (सदस्या,भगिनी मंडळ चोपडा) व सौ.भारती जैन (सदस्या,भगिनी मंडळ चोपडा) उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे बीजभाषक मा.डॉ.मिना कुंटे माजी कुलसचिव तथा प्राचार्य,एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, मुंबई) या होत्या. कार्यक्रमास मा.डॉ.ईश्वर सौंदाणकर (प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय,चोपडा), मा.प्रा.डॉ.विनोद रायपूरे (अध्यक्ष, अभ्यास मंडळ, कबचौउमवि,जळगांव), प्रा.आशिष गुजराथी, प्रा.ज्ञानेश्वर भागवत, प्रा.डॉ.संबोधी देशपांडे, प्रा.डॉ.मोहिनी उपासनी (समन्वयक, राष्ट्रीय परिषद) उपस्थित होते.

सदर परिषदेचे प्रास्ताविक समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांनी केले. यामध्ये त्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे आभार मानले. तसेच महिलांचे राष्ट्रीय विकासातील योगदान या विषयावर जवळपास 70 संशोधन पेपर आज प्रकाशित केले आहे याचा मनस्वी आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. सदर परिदेत महिलांचा विकास आणि राष्ट्रीय योगदान यावर चर्चा घेण्यात येईल. या राष्ट्रीय कार्यशाळेत सर्वांनी सहभाग घेतल त्यांचे अभिनंदन केले.

यानंतर "राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान" या विषयावरील संशोधन पेपराची स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यानंतर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटक प्र.कुलगुरु डॉ.पी.पी.माहुलीकर यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले की, "राष्ट्रीय विकासात महिलांचे योगदान" अशा महत्वपूर्ण विषयावर परिषदेचे आयोजन महाविद्यालयाने केल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेत असेलेले स्त्रियांचे स्थान व सद्यस्थितीत असलेली स्त्रीयांचे परिस्थिती विषद केली. त्यांनी सद्यस्थितीतील राजकीय परिस्थतीवर भाष्य करीत जीवनातील शिस्तीचे व शिक्षणाचे महत्व समजावून सांगितले.

यानंतर राष्ट्रीय परिषदेच्या बिजभाषक मा.डॉ.मीना कुंटे (प्राचार्य, महिला विद्यापीठ, मुंबई) यांनी प्राचीन व आर्वाचीन भारतातील स्त्रियांनी राष्ट्रविकासात दिलेले योगदान स्पष्ट करीत सद्यस्थितीतील स्त्रियांच्या समस्या व उपाय योजना यावर त्यांनी प्रकाशझोत टाकल्या.

यानंतर मा.श्री.आशिषभाई गुजराथी यांनी राष्ट्रविकासाकरीता महिलांचे योगदान अत्यंत महत्वाचे असल्याचे नमूद करीत महिलांचे शिक्षण आणि सुरक्षिताता महत्वाची असल्याचे स्पष्ट केले.

या राष्ट्रीय परिषदेचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.मोहिनी उपासनी आणि डॉ.अनंत देशमुख यांनी केले. उपस्थित मान्यवरांचा परिचय प्रा.डॉ.संबोधी देशपांडे यांनी करुन दिला. या राष्ट्रीय परिषदेत उपस्थित असलेल्या मान्यवरांचे आभार प्रा.ज्ञानेश्वर भागवत यांनी मानले.

यानंतर इतर महाविद्यालयातून आलेल्या प्राध्यापकांनी आपले संशोधन पेपर सादरीकरण केले. यानंतर राष्ट्रीय परषिदेचा समारोप करण्यात आला. यामध्ये समारोपीय भाषणामध्ये प्रा.डॉ.किशोर पाठक (प्राचार्य, पंकज महाविद्यालय, चोपडा) यांनी सदर परिषद यशस्वीरित्या पुर्ण झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. सदर परिषदेमध्ये राष्ट्रीय विकासातील महलिांचे योगदान या विषयावर खुप चांगली चर्चा घडून आली त्याबद्दल त्यानी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

सदर राष्ट्रीय परिषदेच्या समारोपाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ.देशमुख यांनी केले.

**(प्रा.डी.जी.भागवत) (प्रा.डॉ.एम.यु.उपासनी) (प्रा.डॉ.एस.एम.देशपांडे)**

**समन्वयक**

**राष्ट्रीय परिषद-२०२०**

**भगिनी मंडळ चोपडा संचलित,**

**समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव**

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda. Dist. Jalgaon

College of Social Work, Chopda
IQAC
BMC's

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Cho...

**National Conference on Women Contribution in National Development  Date 15-02-2020**






महाराष्ट्र शासन अनुदानित व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव संलग्नीत

भगिनी मंडळ चोपडा संचलित,

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा जि.जळगांव

महाराष्ट्र शासन मान्यता पत्र क्र.
CSW.1094/12355/F.N.107/Sudhar,1 Dt.30/6/1994

विद्यापीठ मान्यता पत्र क्र.
NMU/94/5/J-48/6152 Date:-13/9/1994

Dr.Ishwar M. Saundankar
Principal
Phone No.02586-223017
Fax No. 02586 -223017, 220533

भगिनी मंडळ,
चोपडा, जि. जळगांव
'B' Grade NAAC Accredited (2.66)

Mrs.Poonam Ashish Gujarathi
President
Post Box No.20, Chopda
Phone No.02586-220015

जा.क्रं.- भमसकाम/ /2018-19 दिनांक - / / 2018

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई व**
**भगिनी मंडळ चोपडा संचलित,समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव**
**यांच्या संयुक्त विद्यमाने**

## दोन दिवसीय स्वयंसहाय्यता बचत गटातील पदाधिकाऱ्यांची क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यशाळा कालावधी दि.१९ व २० ऑक्टोबर, २०१८

## अहवाल

**दिनांक-१९ ऑक्टोबर, २०१८ सकाळी- १०.०० ते ११.००- नोंदणी व चहा नाश्ता**

**उद्घाटन सोहळा-**

महिलांना संघटीत करण्यासाठी,त्यांना विकासात्मक स्वरूपाचे शिक्षण देण्यासाठीचे माध्यम म्हणजे बचतगट होय. या बचतगटांच्या माध्यमातून महिलांचे संघटन,बचत आणि काटकसर याची सवय लागते. महिलांना बॅकेच्या व्यवहारांची माहिती मिळते. सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती होते. महिला आर्थिकदृष्टया सक्षम होवून त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

हाच उद्देश डोळयासमोर ठेवून महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या मार्फत चोपडा तालुका कार्यक्षेत्रातील स्वयंसहाय्यता बचत गटातील पदाधिकाऱ्यांची क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजनाचे कार्य आमच्या भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांना देण्यात आले. त्या कार्यशाळेचे आयोजन दिनांक १९ व २० ऑक्टोंबर, २०१८ रोजी घेण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यशाळेचा थोडक्यात अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन मा.श्री.दिलीप रामू पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य, कबचौउमवि,जळगांव यांचे शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मा.सौ.मनिषाताई जिवन चौधरी, नगराध्यक्षा, चोपडो नगर परिषद चोपडा या उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून संजय आर. पाटील, जिल्हा परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, जळगांव, मा.सौ.पुनमताई गुजराथी, अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा, तथा सिनेट सदस्या,कबचौउमवि,जळगांव मा.सौ.अश्विनीताई गुजराथी, जिल्हास्तर सदस्या, जिल्हा कृतीदल वनस्टॉप सेंटर तथा सहसचिव, भगिनी मंडळ चोपडा, तसेच मा.श्री.योगेश तांदळे, सहा.पोलिस निरीक्षक, चोपडा शहर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर

..२...

Sundar Gadhi, Chunchale Road, Tal-Chopda, Dist-Jalgaon
Website:- www.bmcswchopda.org e-mail:- bmcsw.chopda@gmail.com

यांनी केले. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांची वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार बचत गटाच्या पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी संस्थेमार्फत प्रस्ताव तयार करुन पाठविण्यात आला. बचत गटातील महिलांचा विकास व्हावा, त्यांच्यात क्षमाता निर्माण व्हावी हा यामागील उद्देश होता. यानंतर राज्य महिला आयोगाच्या सदस्या मा.देवयानी ठाकरे यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते स्व.डॉ.सुशिलाबेन शाह यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करुन कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. आलेल्या मान्यवरांचे शॉल, पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी श्री संजय आर. पाटील यांनी अशा प्रकारच्या कार्यशाळेबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले व कार्यशाळेच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहनही केले. आपल्या उद्‌घाटनपर मनोगतात मा.दिलीप रामु पाटील यांनी, जळगांव जनता बँकेचे उदाहरण देत जनता बँकेने रु.१० कोटी कर्ज बचत गटांना दिले व बचत गटाच्या माध्यमातून अनेक महिलांना विविध व्यवसाय सुरु केले. स्वत:ची घरे बांधली व स्वत:चा विकास करुन घेतला. अशा प्रकारे बचत गटाचे महत्व सांगितले. महिला बचत गटांत असतांना स्वयशिस्त असणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सौ.अश्विनीताई गुजराथी यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, आज महिलांना सुरक्षित वातावरणाची गरज आहे. महिलांमध्ये जाणीव-जागृती, त्यांची क्षमता बांधणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी सरकारने काढलेल्या विविध योजनांचा लाभ महिलांनी घेवून आपले भविष्य उज्वल करणे आवश्यक आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले. उद्‌घाटनपर कार्यक्रमाचे संचलन डॉ.विनोद रायपुरे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ.विष्णू गुंजाळ यांनी मानले.

**दिनांक-१९ ऑक्टोबर, २०१८ प्रथम सत्र - परिचय**

खेळाचे नाव- परस्पर ओळख परिचय

**उद्देश-** महिलांनी मोकळे पणाने बोलण्याचा प्रत्यन करुन त्याची ओळख होईल व माहितीची देवाण-घेवाण होईल. महिलांना गोल आकारात उभे राहण्यास सांगितले, प्रत्येकास अंकांची चिठ्ठी देण्यात आली. त्यानंतर श्री तडवी सर वर्तूळात आले व त्यांनी एक अंकाचे उच्चारण केले. त्या महिनेने मध्यभागी गोलात येवून आपला परिचय करुन दिला. त्यानंतर दोन व्यक्ती आपल्या जागा बदल करतात यावेळी जी व्यक्ती मध्यभागी येते तीने रिकामी जागेवर पटकन जावे जेणे करुन दुसऱ्या महिलेवर राज्य येईल व ती आपली माहिती देईल या प्रकारे जो नंबर येतो त्याची चिठ्ठी फाडून टाकण्यात आल्या त्यानंतर प्रथम सत्राची सुरुवात झाली.

**विषय- बचत गटाची संकल्पना, लेखा व आर्थिक साक्षरता**
**प्रशिक्षक- सौ.पुनम पाटील व वैशाली पाटील, प्रेरणा साधन केंद्र चोपडा**

यात संघटन व त्याचे महत्व, स्वयंसहाय्यता बचत गट संकल्पना व गरज महत्व, रचना कार्यपध्दती यावर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांना स्वंयसहाय्यता बचत गट म्हणजे काय? तो का व कशासाठी निर्माण झाला? याविषयी माहिती सांगितली, महिलांनी स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करावा ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी त्याचे महत्व स्पष्ट करुन सांगितले.

गट स्थापन करण्यासाठी १० महिला व जास्तीत जास्त २० महिला असाव्यात- २० पेक्षा जास्त महिला गटात असतील तर गट चालवणे अवघड होते व कायदेशीर नोंदणी करण्यास अवघड होते. गटाला नाव द्यावे, गट सदस्यांत बचतीची रक्कम समान असावी. रक्कम गोळा करण्यासाठी महिन्याला एक मिटींग घ्यावी व त्याच वेळी पैसे भरावे. त्यामुळे बचतीची योग्य नोंद एकाच वेळी करता येते. कोणी पैसे दिले हे सर्वांना स्पष्ट होते व सगळयांसमोर हिशोब ठेवता येतो. त्यामुळे विश्वास रहातो. रक्कम कोणा एकाकडे न ठेवता ती गटाच्या नावाने बँकेत खाते उघडून दर महिन्याला जमा करावी. गट सदस्यांनी आलटून पालटून बँकेत जावे जेणे करुन प्रत्येक सदस्यांना बँकेची माहिती मिळते. पुढे तीन-चार महिन्यांनी गटातील कोणाला अडचण आली तर दोन महिलांना जामिनदान ठेवून गटाचे कागदपत्र भरुन त्या महिला सदस्येस कर्ज देता येते व अडचणीतून तिची मुक्तता करता येते.

**प्रथम सत्रानंतर दुपारी ०१.३० ते ०२.३० -भोजन-**

**द्वितीय सत्र- दुपारी- ०२.३० ते ४.००**

**विषय- उपजिविका उद्योग- शेळीपालन, शिलाईकाम आणि दुधडेअरी**

**प्रशिक्षक- श्री.सलिम तडवी व सौ.पुनम पाटील, प्रेरणा साधन केंद्र चोपडा**

महिलांना आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वंयसहाय्यता बचत गटाची स्थापना करण्यात आली आहे. स्वयसहाय्यता याचा अर्थ असा होतो की, स्वतःनेच स्वतःला मदत करणे होय. मागील सत्रातील आढावा घेवून त्यात आलेले मुद्दे मांडत सौ पाटील यांनी स्त्रीयांनी आर्थिक सक्षम होण्यासाठी त्यांना गटामार्फत बँकेतून कर्ज मिळते व ते मिळालेले पैसे महिलांनी स्व-विकासासाठी कसे खर्च करावे यावर माहिती दिली. महिलांना मिळालेले पैसे हे त्यांनी शेळी विकत घेवून त्याचे दुध व लेंडी विकून पैसे कमवता येतात. त्याच प्रमाणे ज्या महिलांना शिलाई कामात आवड असेल त्यांनी पिको-फॉल मशिन, शिलाई मशिन घेवून स्वतंत्र व्यवसाय सुध्दा करता येईल व आर्थिक सक्षम बनता येईल. त्याच प्रमाणे दूध केंद्र सुध्दा शहराच्या व नागरी वस्तीच्या ठिकाणी उघडता येईल व स्व-ओळख निर्माण करता येईल अशी माहिती दिली. त्यानंतर श्री सलीम तडवी यांनी पंचसुत्री यावर मार्गदर्शन केले. त्यात सर्व प्रथम प्रार्थना घेण्यात आली व त्यांनतर पंचसुत्री सांगण्यात आली.

१) बचत गट अध्यक्ष- दर २ वर्षांनी सर्व संमतीने बदल करण्यात यावा.

२) बैठक का घ्यावी?- आपण जिथे राहतो तेथील आर्थिक/सामाजिक समस्या समजतात.

३) बैठक कशी घ्यावी? - तारीख, वेळ, ठिकाण निश्चित करुन गरजेनुसार पंधरा दिवस किंवा एक महिन्यांनी बैठक घ्यावी.

४) बैठक आलटून-पालटून वेगवेगळया सदस्याच्या घरी घ्यावी. जेणे करुन कौटुंबिक सदस्यांनाही बचत गटाविषयी माहिती मिळते. कुटूंब सदस्य सहभागी होतात व जिव्हाळा निर्माण होतो.

५) बैठक गोलाकार बसून घ्यावी, जेणे करुन समान पातळींची जाणीव होते. सगळयांना आर्थिक व्यवहार कळतात व सर्व व्यवहार नजरे समोर होतात व गटाच्या कामात पारदर्शकता निर्माण होते.

**दुपारी- ०४.०० ते ०४.१५ चहाणाणी**

**दुपारी- ०४.१५ ते ०५.०० चर्चासत्र**

महिलांच्या आपापल्या गटाच्या विषयीचे अनुभव सर्वसमक्ष सादर केले व त्यावर चर्चा करण्यात आली.

---

**दिनांक-२० ऑक्टोबर, २०१८ तृतीय सत्र** **सकाळी- ९.३० ते १०.०० चहा व नाश्ता**

**सकाळी-१०.०० ते ११.३०**

**प्रशिक्षक- श्री. सलिम तडवी** **विषय- गटचर्चा**

पहिल्या दिवसाच्या प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात आला. श्री सलीम तडवी यांनी सर्व महिलांशी चर्चा केली. तसेच पंचसुत्रीचे परत एकदा पुर्नःवाचन करण्यात आले. गटात येणाऱ्या समस्या व आपण काय शिकलो यावर चर्चा करण्यात आली.

**सकाळी- ११.३० ते १२.३० चतुर्थ सत्र**

**विषय- महिलांचे जीवनचक्र व समस्या**

**प्रशिक्षक- डॉ.विनोद ए. रायपुरे**

डॉ.रायपुरे यांनी संपूर्ण आलेल्या महिलांना १ २ ३ ४ असे नंबर बोलावयास सांगितले. ज्या महिलांचे नं १ असेल त्यांचा गट वेगळा, २- नंबर असलेल्यांचा गट वेगळा असे ४ गट वेगळे करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक गटास महिलांच्या वयोगटानुसार जीवनचक्रामध्ये येणाऱ्या विविध समस्या या विषयी प्रत्येक गटास विषय देण्यात आले, त्यांत ० ते १० वयोगटातील महिलांच्या समस्या, १० ते २० वयोगटातील महिलांच्या समस्या, २० ते ३० वयोगटातील महिलांच्या समस्या, ३० ते ४५ वयोगटातील महिलांच्या समस्या यावर गटातील महिलांनी चर्चा करुन वेगवेगळे मुद्दे तयार केले. गटातील ३ सदस्यांनी स्टेजवर येवून त्यांचे सादरीकरण केले. यातून सगळया महिलांनी आपआपल्या परीने स्वतंत्र मते मांडली. त्यात स्त्री जन्म, लिंगभेद, शिक्षण, नोकरी, इ.चा समावेश आहे व या सर्व समस्यांना सोडवण्याकरीता बचत गटाच्या माध्यमातून कसे प्रयत्न करता येतील व त्यामध्ये पदाधिकाऱ्यांची काय भुमिका असे या विषयी सत्राच्या शेवटी चर्चा करण्यात आली.

**दुपारी- १२.३० ते ०१.३० चतुर्थ सत्र**

**विषय- गटसंचलनात जबाबदारीचे विभाजन**

**प्रशिक्षक- श्री.संजय आर.बारी,**

स्वयंसहाय्यता बचत गटाचे संचलन करतांना गटामध्ये पदाधिकारी जे आहेत त्यांनी गटातील विविध कामाची विभागणी जर केली तर कार्य हे चांगल्या प्रकारे पार पाडू शकते व गटाच्या विकासाकरीता हातभार लागू शकतो याकरीता एक विटांच्या तुकडयांचा खेळ घेण्यात आला. या खेळात इच्छूक महिलांना स्टेजवर बोलावले आणि त्यातच एक महिला अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व दोन महिला सदस्या असे निवड

स्वत:हून करावयास सांगीतली. एखाद्या कार्यक्रमाच्या आयोजनात कामाचा भार किती, कोणाला व कसा दिला जातो हे यातून दाखविण्यात आले. व्यक्तिची क्षमता, कुवत व त्यास सामावून घेवून त्यास जबाबदारी द्यावे व त्याचा आत्मसन्मान वाढवावा. त्याच्यात गटा विषयी व कार्यक्रमा विषयी आपूलकी निर्माण व्हावी याकडे गटाध्यक्षाने लक्ष द्यावे. या विषयीची माहिती या खेळातून मिळाली.

**दुपारी- ०१.३० ते ०२.३० भोजन**

**दुपारी- ०२.३० ते ०३.३० समारोप व प्रमाणपत्र वाटप**

समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री एस.डी.चौधरी, मुख्याध्यापक, महिला मंडळ माध्य.उच्च माध्य. विद्यालय चोपडा हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा.आशिष गुजराथी, डॉ.विनोद रायपुरे, डॉ.राहूल निकम, श्री.संजय बारी, श्री. सलीम तडवी, सौ.वैशाली पाटील, सौ पुनम पाटील हे उपस्थित होते. दोन दिवशीय प्रशिक्षणाच्या बाबत प्रशिक्षणार्थीमधून प्रातिनीधीक स्वरुपात प्रशिक्षणाविषयी दोन महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये अशा प्रकारचे प्रशिक्षण वेळोवेळी मिळाल्यास आमच्या ज्ञानात भर पडेल व आम्ही चांगल्या प्रकारे काम करु शकु असे मत व्यक्त केले. प्रशिक्षणाचा कालावधी ३ ते ५ दिवस असावा असेही अपेक्षा व्यक्त केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री एस.डी.चौधरी यांनी सांगितले की, बचत गटाने विदेशातही काम केले आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल होत आहे. कमकुवत असलेल्या कुटूंबाला सहारा देण्याचे काम यातून होते. एका थव्यातील पक्षाप्रमाणे आर्थिक कमजोर असलेलया स्त्रीला/ महिलेस सक्षम बनविण्याचे काम बचत गटांमार्फत होत आहे. यामाध्यमातून महिलांना स्वत:ची ओळख निर्माण करता येईल असे मत त्यांनी व्यक्ती केले. कार्यक्रमाचे आभार डॉ.राहूल निकम यांनी मानले. या कार्यक्रमातून महिलांमध्ये उर्जा निर्मितीचे कार्य करण्यात आले. सतत प्रयत्नशिल राहण्यासाठी, कार्यशिल राहण्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत उपयोगाची ठरली. सर्वांचे आभार मानले...!

शेवटी काही प्रशिक्षणार्थीकडून फिडबॅक फॉर्म भरुन घेण्यात आले.

धन्यवाद..!

**(डॉ.विनोद अ. रायपुरे)**
**सहा.प्रकल्प प्रमुख**

**(प्रा.आशिष एस.गुजराथी)**
**प्रकल्प प्रमुख**

**(डॉ.ईश्वर एम.सौंदाणकर)**
**प्राचार्य,**
**भगिनी मंडळ चोपडा संचलित,**
**समाजकार्य महाविद्यालय चोपडा,**
**जि.जळगांव**

**Workshop on Capacity Building of SHG Office Bearers** **Date : 19 & 20 Oct. 2018**






IQAC BMC's College of Social Work, Chopda

पुण्य नगरी

दिनांक- २१/०१०/२०१८

# बचतगट क्षमता बांधणी कार्यशाळेचे उद्‌घाटन उत्साहात

अडावद, ता. चोपडा : भगिनी मंडळ चोपडा येथे महाराष्ट्र राज्य महिला आयोग व भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्वयंसहाय्यता बचत गटातील पदाधिकाऱ्यांची क्षमता बांधणी कार्यशाळेच्या उद्‌घाटनाचा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्‌घाटक कबचौउमविचे व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषदेचे नगराध्यक्षा मनीषा चौधरी हे उपस्थीत होते. प्रमुख अतिथी जिल्हा परिविक्षा अधिकारी संजय पाटील, अध्यक्षा भगिनी मंडळ पूनमबेन गुजराथी, अश्विनी गुजराथी, सहायक पोलीस निरीक्षक जोशी सादळे, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर, प्रकल्प प्रमुख प्रा. आशिष गुजराथी, सहायक प्रकल्पप्रमुख प्रा.डॉ. विनोद रायपुरे, कार्यशाळेचे तज्ञ मार्गदर्शक सलीम तडवी (व्यवस्थापक महिला आर्थिक विकास महामंडळ), पुनम पाटील (क्षेत्रीय समन्वयक महिला आर्थिक विकास महामंडळ), वैशाली पाटील (उपजीविका समन्वयक महिला आर्थिक विकास महामंडळ), सर्वांतील विविध विभागांचे विभागप्रमुख, समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व परिसरातील बचत गटाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांनी सादर केले.

कार्यक्रमादरम्यान, इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्सेस रिसर्च, नवी दिल्ली या संस्थेद्वारे अनुदानित प्रकल्पामध्ये महाविद्यालयाचे प्रा. डॉ. मारती



गायकवाड (प्रकल्पप्रमुख) यांनी प्रकल्पाशी व संशोधनाशी संबंधित एकूण ३२ पुस्तके मान्यवरांच्याहस्ते महाविद्यालयास भेट म्हणून दिली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. विनोद रायपुरे यांनी केले. प्रा. डॉ. [illegible] यांनी आभार प्रदर्शन केले.

यशस्वीतेसाठी [illegible] प्रा. [illegible] [illegible] यांनी [illegible] केले. कार्यशाळेसाठी [illegible] १२० पदाधिकारी उपस्थित होते.

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work Chopda

महाराष्ट्र राज्य महिला आर्थिक विकास महामंडळ ... संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा
यांच्या संयुक्त विद्यमाने

| अ.क्र. | नाव | पत्ता | फोन नंबर | १३/१०/२०२१ | २०/१०/२०२१ |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | श्री. शोभाबाई गोरख चाविस्कर | पंचशील नगर, चोपडा | ८६८९९३०३० | [illegible] | [illegible] |
| २ | श्री. अलकाबाई रणजीत वाघ | —"— | ८८२०८३४४४४ | [signature] | [signature] |
| ३ | पूनम योगेश पाटील | चोपडा - गणेश कॉलनी | ८३०२०८८८७० | [signature] | [signature] |
| ४ | वैशाली प्रकाश पाटील | लासूर - | ९९२२७९५२०७ / ८८८३८३२०२ | [signature] | [signature] |
| ५ | शिवानी विनोद बारी | चोपडा | ८८९०४८८९३३ | [signature] [thumb impression] | [signature] [thumb impression] |
| ६ | आरती विजय वाघे | —"— पाटील गढी | | [illegible] | [illegible] |
| ७ | कमलबाई रुजाराम वाडे | —"— —"— | ८८२३८२८२०९ | [illegible] | [illegible] |
| ८ | शोभा शरद आघाव | कुंभारवाडा चोपडा | | | |
| ९ | मालिनी कुंडलिक वाघे | पाटील गढी - चोपडा | | [thumb impression] | [thumb impression] |
| १० | चंपाबाई वामन वाडे | —"— —"— | | [thumb impression] | [thumb impression] |
| ११ | शोभाबाई कचरू वाडे | —"— —"— | ८९८३६८३२०८ | [signature] | [signature] |
| १२ | आई गौतम चाविस्कर | —"— —"— | ९४४२९८४६७४ | मिना बाई | मिना बाई |
| १३ | रेखा शांताराम पाटील | कुंभारवाडा - चोपडा | ८८०४४४६८६६ | सुनिता बाई | सुनिता |
| १४ | रंजना संतोष पाटील | —"— | | | |

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work, Chopda

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit

BMC's, College of Social Work, Chopda — IQAC (stamp)

संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा
यांच्या संयुक्त विद्यमाने

| अनु क्र | नाव | पत्ता | फोन नंबर | ११/१०/२०१८ सिग्नेचर | १०/१०/२०१८ सिग्नेचर |
|---|---|---|---|---|---|
| | | | ७७५९८८२१८११ | | |
| १५ | जीजाबाई सुनिल [illegible] | पंचशील नगर - चोपडा | | [illegible] | पुजा बाई |
| १६ | पुजा विलास [illegible] | —"— | ७७२००३३८८९ | [illegible] | [illegible] |
| १७ | सुशिलाबाई [illegible] | बारी वाडा - चोपडा | ८८८३८३२०२ | [illegible] | [illegible] |
| १८ | विमलबाई किसन बारी | —"— | | [illegible] | [illegible] |
| १९ | [illegible] मनोज जैन | [illegible] गल्ली - चोपडा | | [illegible] | [illegible] |
| २० | [illegible] जैन | [illegible] दरवाजा - चोपडा | ८९४५४३६५४७ | [illegible] | |
| २१ | [illegible] माळी | फुले नगर चोपडा | ८८२२८८३६८७ | | |
| २२ | [illegible] माळी | —"— | ९५४४२८८८९८ | | |
| २३ | हिराबाई [illegible] माळी | —"— | | | |
| २४ | [illegible] माळी | —"— | ८८०४०२०५५४ | | |
| २५ | सिंधुबाई [illegible] माळी | —"— | | | |
| २६ | [illegible] माळी | —"— | | | [illegible] |
| २७ | [illegible] माळी | —"— | | | |

Co-Ordinator,
Internal Quality Assurance Cell
BMC's, College of Social Work
Chopda, Dist. Jalgaon

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work, Chopda

BMC's, College of Social Work, Chopda IQAC

||संस्कृती रक्षतिः स्त्री शक्तिः||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव

भगिनी मंडळ,
चोपडा, जि. जळगांव

**स्थापना वर्ष-१९९४**

# शिक्षण आणि संधी

## एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद अहवाल

**दिनांक-०९ मार्च, २०१९**


प्रा. आशिष एस. गुजराथी
संयोजक

डॉ.ईश्वर आय. सौंदाणकर
प्राचार्य

प्रा.शैलेश बी. पाटील
समन्वयक

प्रा. अनंत व्ही. देशमुख
समन्वयक ( IQAC )

Sundhargadhi, Chunchale Road,
Tal-Chopda, Dist-Jalgaon
Phone No.02586-223017

# शिक्षण आणि संधी या एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचा अहवाल

## दि. ०९ मार्च, २०१९

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा आयाजित आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव प्रायोजित दि. 09 मार्च, 2019 रोजी एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन शिक्षण आणि संधी या विषयावर करण्यात आले होते.

सदर परिषदेच्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा.जगदिशचंद्र वळवी, (माजी आमदार,चोपडा) तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. प्रा. श्री. अरुणभाई गुजराथी (माजी विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य मुंबई) प्रमुख अतिथी मा. श्री. दिलीप रामु पाटील (व्यवस्थापन परिषद सदस्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव) मा. प्रा. नितीनजी बारी (व्यवस्थापन परिषद सदस्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव) मा. श्री. चंद्राहासभाई गुजराथी (चेअरमन, चोपडा पिपल्स को. ऑप. बँक, चोपडा) मा. सौ. पुनमबेन गुजराथी (अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा) मा.सौ. छायाबेन गुजराथी (उपध्याक्षा, भगिनी मंडळ चोपडा) मा. सौ. अश्विनीताई गुजराथी (सहसचिव भगिनी मंडळ चोपडा) मा. अक्रम सालेह मुशाहिद अलसुबारी (साना यमेन) मा. आशिषभाई गुजराथी (उद्योजक), मा. प्रभाबेन अरुणलाल गुजराथी (संचालक, भगिनी मंडळ,चोपडा) तसेच कार्यक्रमाचे बीजभाषक मा.डॉ.किशोर निकम (विभाग प्रमुख वाणिज्य विभाग,डॉ. डी. व्हाय. पाटील कला व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय पिंप्री, पुणे) मा.डॉ.ईश्वर सौंदाणकर (प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय,चोपडा), मा.प्रा.डॉ.विनोद रायपूरे (विभाग प्रमुख, समाजकार्य महाविद्यालय,चोपडा),

यानंतर दिवंगत डॉ. सुशिलाबेन शाह यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करून आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन करण्यात आले.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्रास्ताविक प्रा. अनंत देशमुख समाजकार्य महाविद्यालय,चोपडा यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात प्रा. देशमुख यांनी सांगितले की समाजकार्य महाविद्यालय चोपडा हे गेल्या 25 वर्षापासुन कार्यरत असुन 2 एफ आणि 12 बी. प्राप्त तसेच नॅक व्दारा ब दर्जा प्राप्त केलेले महाविद्यालय असुन गेल्या 25 वर्षात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे व चर्चासत्राचे आयोजन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांवच्या आर्थिक मदतीतुन विद्यार्थी, शिक्षक आणि समाज घटकांसाठी आयोजित करण्यात आले. भारतातील शिक्षणाचा जीइआर 2030 पर्यंत 30 टक्के वाढवण्याचा शासनाचा मनोदय असुन फेब्रूवारी 2019 पर्यंत भारतातील रोजगारीचा दर 15.02 टक्के असल्यामुळेच शिक्षण आणि संधी या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. असे प्रास्ताविकेत त्यांनी विषद केले.

यानंतर आंतरराष्ट्रीय परिषदेचे प्रास्ताविक मा. सौ. पुनमबेन गुजराथी (अध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा) यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी ही आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्या मागील उद्देश त्यांनी सांगितला तसेच आजच्या उच्च शिक्षणाची जबाबदारी आणि आजच्या काळातील त्याचे वाढते महत्व यावर आधारित विषय घेऊन यातून जी चर्चा होईल ती निश्चितच पुढील वाटचालीस आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यानंतर आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने प्रकाशित Education and Opportunities या शोधनिबंधपर पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रा.डॉ.राहुल निकम यांनी लिहिलेल्या व्यक्तीसहयोग कार्य , डॉ. संबोधी देशपांडे यांनी लिहीलेल्या महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना आणि अनु. जातींच्या मजुरांची स्थिती, डॉ. मोहिनी उपासनी यांनी लिहलेल्या कामगारांची कार्यस्थिती व कार्य समाधानता पुस्तकाचे प्रकाशन देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

ाानंतर आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनपर भाषणात मा. जगदिशचंद्र वळवी यांनी शिक्षणातुन अधिक संधी निर्माण होत असतांत. आदिवासी क्षेत्रात आता शिक्षण पोहचु लागले आहे. परुतू व्यवसाभिमुख शिक्षणाबाबत आजही समाजात स्पष्टता नाही. शिक्षण बाबत आपल्या देशात मोठ्या प्रमाणात विसंगती आहे. कौशल्यवृध्दी संदर्भात शिक्षणातुन प्रयत्न होणे गरजेचे आहे. असा विचार माजी आमदार जगदीशचंद्र वळवी यांनी यावेळी मांडला.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. श्री. दिलीप रामु पाटील (व्यवस्थापन परिषद सदस्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव) यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात समाजात अनेक समस्या शिक्षित लोकांमुळे असल्या तरी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणामुळे भौतिक परिस्थीती सुधारली, पण मुल्यांचा ऱ्हास झाला. हे दुर्दैव आहे. म्हणुन घेतलेल्य शिक्षणाचा आपल्या समजा व गावासाठी उपयोग झाला पाहिजे हा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. असे मत कबचौ उमविचे सिनेट सदस्य प्रा. दिलीप रामू पाटील यांनी व्यक्त केले.

यानंतर कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख अतिथी मा. प्रा. नितीनजी बारी (व्यवस्थापन परिषद सदस्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव) यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात समाजात समाज शिक्षणापर्यंत पोहचत नसेल तर शिक्षणाने समाजपर्यंत पोहचले पाहिजे. तिथे शिक्षण पोहचवुन संधी निर्माण केल्या पाहिजे. कौशल्याधारीत शिक्षणातुन अद्यमशीलता कशी निर्माण करता यईल याचा विचार झाला पाहिजे. शिक्षणातुन स्वतःला सिध्द करण्याची क्षमता निर्माण होत असते. असे मत कबचौ उमविचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. नितीन बारी यांनी व्यक्त केले.

यानंतर आंतरराष्ट्रीय परिषदेच्या अध्यक्ष मा. प्रा. अरुणभाई गुजराथी (माजी विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य) यांनी आपल्या भाषणात नव्या पिढीला तुमचे जुनाट अनुभव नकोय तर संधी हवीय, पंखांसाठी बळ हवय. बदल हा निसर्गाचा नियम आहे. भविष्यातील संधीचा विचार करुन नवा अभ्यासक्रम गरजानुरुप बदलत गेला पाहिजे.

व्हॅल्यु एज्युकेशन देत असतांना त्यात गरजानुरूप व्हॅल्यु ॲडीशन करणे आवश्यक आहे. देशाची संस्कृती बदलवणारे शिक्षण आपल्याला नकोय. करा किंवा मरा हा विचार शिक्षणातुन रुजवावा लागेल. स्वतःशी स्पर्धा करणारे शिक्षण हवे. शिकवणे शिकणे हे आव्हानात्मक काम आहे. शिक्षण निरंतर चालणारा प्रवास आहे ते जीवन प्रवासातील अंतिम स्थानक नव्हे. मन मस्तक आणि मनगटाची गुणवत्ता शिक्षणातुन निर्माण झाली पाहीजे, असेही त्यांनी सांगितले.

यानंतर या आंतरराष्ट्रीय परिषदेचे बीजभाषक डॉ. श्री किशोर निकम (विभाग प्रमुख वाणिज्य विभाग,डॉ. डी. व्हाय. पाटील कला व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय पिंप्री, पुणे) यांनी आपल्या बिज भाषणात सांगितले की, वैद्यकीय, अभियंत्रीकी, कायदा, शिक्षण या मुख्य विद्या शाखा आपला देशात असुन त्यामाध्यामातुन देशातील पीढी शिक्षण घेत आहे. शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात समन्चय असणे

गरजेचे आहे. कृषी क्षेत्र आणि त्याविषयीचे शिक्षण आपल्याकडे दुर्लक्षित आहे. येणाऱ्या काळात अन्न धान्याची समस्या बधुन तिकडे नवी पीढी वळत नाही हा भविष्यातला मोठा धोका आहे. आपल्याकडे बुध्दिमत्ता , कारणमिमांसा, तर्किक क्षमता या बाबींवर शालेय व महाविद्यलयीन शिक्षणातुन भर दिली जात नाही.

सदर आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.शैलेश पाटील यांनी केले तर आभार प्रा.आशिष गुजराथी यांनी मानले.

यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला. दुपारच्या सत्रामध्ये राष्ट्रीय परिषदेकरीता उपस्थित असलेल्या संशोधक व प्राध्यापक यांनी 6 विभांगामध्ये आपले संशोधन पेपर सादर केले. सदर संशोधन पेपर सादरीकरणाची रूपरेषा अहवालासोबत जोडलेली आहे.

